.. Dasabodh by Samartha Ramadas Swami Chapter 17 ..
॥ समर्थ रामदासांचा दासबोध दशक १७ ॥

॥ दशक सतरावा : प्रकृतिपुरुष ॥ १७॥
समास पहिला : प्रकृतिपुरुषनाम
॥ श्रीराम ॥
निश्चळ ब्रह्मीं चंचळ आत्मा । सकळां पर जो परमात्मा ।
चैतन्य साक्षी ज्ञानात्मा । शड्गुणैश्वरु ॥ १॥
सकळ जगाचा ईश्वरु । म्हणौन नामें जगदेश्वरु ।
तयापासून विस्तारु । विस्तारला ॥ २॥
शिवशक्ती जगदेश्वरी । प्रकृतिपुरुष परमेश्वरी ।
मूळमाया गुणेश्वरी । गुणक्षोभिणी ॥ ३॥
क्षेत्रज्ञ द्रष्टा कूटस्त साक्षी । अंतरात्मा सर्वसाक्षी ।
सुद्धसत्व महत्तत्व परीक्षी । जाणता साधु ॥ ४॥
ब्रह्मा विष्णु महेश्वरु । नाना पिंडी जीवेश्वरु ।
त्यास भासती प्राणीमात्रु । लहानथोर ॥ ५॥
देहदेउळामधें बैसला । न भजतां मारितो देहाला ।
म्हणौनि त्याच्या भेणें तयाला । भजती लोक ॥ ६॥
जे वेळेसी भजन चुकले । तें तें तेव्हां पछ्याडिलें ।
आवडीनें भजों लागले । सकळ लोक ॥ ७॥
जें जें जेव्हां आक्षेपिले । तें तें तत्काळचि दिधलें ।
त्रैलोक्य भजों लागलें । येणें प्रकरें ॥ ८॥
पांचा विषयांचा नैव्यद्य । जेव्हां पाहिजे तेव्हां सिद्ध ।
ऐसें न करितां सद्य । रोग होती ॥ ९॥
जेणें काळें नैव्यद्य पावेना । तेणें काळें देव राहेना ।
भाग्य वैभव पदार्थ नाना । सांडून जातो ॥ १०॥
जातो तों कळो देईना । कोणास ठाउकें होयेना ।
देवेंविण अनुमानेना । कोणास देव ॥ ११॥
देव पाहावयकारणें । देउळें लागती पाहाणें ।
कोठेंतरी देउळाच्या गुणें । देव प्रगटे ॥ १२॥
देउळें म्हणिजे नाना शरीरें । तेथें राहिजें जीवेश्वेरे ।
नाना शरीरें नाना प्रकारें । अनंत भेदें ॥ १३॥
चालतीं बोलतीं देउळें । त्यामधें राहिजें राउळें ।
जितुकीं देउळें तितुकीं सकळें । कळली पाहिजे ॥ १४॥
मछ कूर्म वाराह देउळें । भूगोळ धरिला सर्वकाळें ।
कराळें विक्राळें निर्मळें । कितियेक ॥ १५॥
कित्येक देऊळीं सौख्य पाहे । भरतां आवघें सिंध आहे ।
परी तें सर्वकाळ न राहे । अशाश्वत ॥ १६॥
अशाश्वताचा मस्तकमणीं । जयाची येवढी करणी ।
दिसेना तरी काय जालें धनी । तयासीच म्हणावें ॥ १७॥
उद्भवोन्मुख होतां अभेद । विमुख होतां उदंड खेद ।
ऐसा अधोर्ध संवाद । होत जातो ॥ १८॥
सकळांचे मूळ दिसेना । भव्य भारी आणी भासेना ।
निमिष्य येक वसेना । येके ठाइं ॥ १९॥
ऐसा अगाध परमात्मा । कोण जाणे त्याचा महिमा ।
तुझी लीळा सर्वोत्तमा । तूंच जाणसी ॥ २०॥
संसारा आलियाचें सार्थक । जेथें नित्यानित्यविवेक ।
येहलोक आणी परलोक । दोनीं साधिले ॥ २१॥
मननसीळ लोकांपासीं । अखंड देव आहिर्निशीं ।
पाहातां त्यांच्या पूर्वसंचितासी । जोडा नाहीं ॥ २२॥
अखंड योग म्हणोनि योगी । योग नाहीं तो वियोगी ।
वियोगी तोहि योगी । योगबळें ॥ २३॥
भल्यांची महिमा ऐसी । जे सन्मार्ग लावी लोकांसी ।
पोहणार असतां बुडतयासी । बुडों नेदावें ॥ २४॥
स्थूळसूक्ष्मतत्वझाडा । पिंडब्रह्मांडाचा निवाडा ।
प्रचित पाहे ऐसा थोडा । भूमंडळीं ॥ २५॥
वेदांतीचें पंचिकर्ण । अखंड तयाचें विवर्ण ।
माहांवाक्यें अंतःकरण । रहस्य पाहे ॥ २६॥
ये पृथ्वीमधें विवेकी असती । धन्य तयांची संगती ।
श्रवणमात्रें पावती गती । प्राणीमात्र ॥ २७॥
सत्संग आणी सत्शास्त्रश्रवण । अखंड होतसे विवर्ण ।
नाना सत्संग आणी उत्तम गुण । परोपकाराचे ॥ २८॥
जे सद्कीर्तीचे पुरुष । ते परमेश्वराचे अंश ।
धर्मस्थापनेचा हव्यास । तेथेंचि वसे ॥ २९॥
विशेष सारासार विचार । तेणें होय जग्गोद्धार ।
संगत्यागें निरंतर । होऊन गेले ॥ ३०॥
इति श्रीदासभोधे गुरुशिष्यसंवादे
देवबळात्कारनाम समास पहिला ॥ १॥ १७.१

समास दुसरा : शिवशक्तिनिरूपण
॥ श्रीराम ॥
ब्रह्म निर्मळ निश्चळ । जैसें गगन अंतराळ ।
निराकार केवळ । निर्विकारी ॥ १॥
अंतचि नाहीं तें अनंत । शाश्वत आणी सदोदित ।
असंत नव्हे तें संत । सर्वकाळ ॥ २॥
परब्रह्म तें अविनाश । जैसें आकाश अवकाश ।
न तुटे न फुटे सावकास । जैसें तैसें ॥ ३॥
तेथें ज्ञान ना अज्ञान । तेथें स्मरण ना विस्मरण ।

तेथें अखंड निर्गुण । निरावलंबी ॥ ४॥
तेथें चंद्र सूर्य ना पावक । नव्हे काळोखें ना प्रकाशक ।
उपाधीवेगळें येक । निरोपाधी ब्रह्म ॥ ५॥
निश्चळीं स्मरण चेतलें । त्यास चैतन्य ऐसें कल्पिलें ।
गुणासमत्वें जालें । गुणसाम्य ऐसें ॥ ६॥
गगनीं आली अभ्रच्छाया । तैसी जाणिजे मूळमाया ।
उद्भव आणी विलया । वेळ नाहीं ॥ ७॥
निर्गुणीं गुणविकारु । तोचि शड्गुणैश्वरु ।
अर्धनारीनटेश्वरु । तयास म्हणिजे ॥ ८॥
आदिशक्ति शिवशक्ति । मुळीं आहे सर्वशक्ति ।
तेथून पुढें नाना वेक्ती । निर्माण जाल्या ॥ ९॥
तेथून पुढें शुद्धसत्व । रजतमाचें गूढत्व ।
तयासि म्हणिजे महत्तत्व । गुणक्षोभिणी ॥ १०॥
मुळीं असेचिना वेक्ती । तेथें कैंची शिवशक्ती ।
ऐसें म्हणाल तरी चित्तीं । सावधान असावें ॥ ११॥
ब्रह्मांडावरून पिंड । अथवा पिंडावरून ब्रह्मांड ।
अधोर्ध पाहातां निवाड । कळों येतो ॥ १२॥
बीज फोडून आणिलें मना । तेथें फळ तों दिसेना ।
वाढत वाढत पुढें नाना । फळें येती ॥ १३॥
फळ फोडितां बीज दिसे । बीज फोडितां फळ नसे ।
तैसा विचार असे । पिंडब्रह्मांडीं ॥ १४॥
नर नारी दोनी भेद । पिंडीं दिसती प्रसिद्ध ।
मुळी नस्तां विशद । होतील कैसीं ॥ १५॥
नाना बीजरूप कल्पना । तींत काये येक असेना ।
सूक्ष्म म्हणोनि भासेना । येकायेकीं ॥ १६॥
स्थूळाचें मूळ ते वासना । ते वासना आधीं दिसेना ।
स्थूळावेगळें अनुमानेना । सकळ कांहीं ॥ १७॥
कल्पनेची सृष्टी केली । ऐसीं वेदशास्त्रें बोलिलीं ।
दिसेना म्हणोन मिथ्या केली । न पाहिजेत कीं ॥ १८॥
पडदा येका येका जन्माचा । तेथें विचार कळे कैंचा ।
परंतु गूढत्व हा नेमाचा । ठाव आहे ॥ १९॥
नाना पुरुषांचे जीव । नाना स्त्रियांचे जीव ।
येकचि परी देहस्वभाव । वेगळाले ॥ २०॥
नवरीस नवरी नलगे । ऐसा भेद दिसों लागे ।
पिंडावरून उमगे । ब्रह्मांडबीज ॥ २१॥
नवरीचें मन नवऱ्यावरी । नवऱ्याचें मन नवरीवरी ।
ऐसी वासनेची परी । मुळींहून पाहावी ॥ २२॥
वासना मुळींची अभेद । देहसमंधें जाला भेद ।
तुटतां देहाच समंध । भेद जेला ॥ २३॥
नरनारीचें बीजकारण । शिवशक्तीमधें जाण ।
देह धरितां प्रमाण । कळों आलें ॥ २४॥
नाना प्रीतीच्या वासना । येकाचें येकास कळेना ।
तिक्षण दृष्टीनें अनुमाना । कांहींसें येतें ॥ २५॥
बाळकास वाढवी जननी । हें तों नव्हे पुरुषाचेनी ।
उपाधी वाढे जयेचेनी । ते हे वनिता ॥ २६॥
वीट नाहीं कंटाळानाहीं । आलस्य नाहीं त्रास नाहीं ।
इतुकी माया कोठेंचि ना हीं । मातेगेगळी ॥ २७॥
नाना उपाधी वाढऊं जाणे । नाना मायेनें गोऊं जाणे ।
नाना प्रीती लाऊं जाणे । नाना प्रपंचाची ॥ २८॥
पुरुषास स्त्रीचा विश्वास । स्त्रीस पुरुषाचा संतोष ।
परस्परें वासनेस । बांधोन टकिलें ॥ २९॥
ईश्वरें मोठें सूत्र केलें । मनुष्यमात्र गुंतोन राहिलें ।
लोभाचें गुंडाळें केलें । उगवेना ऐसें ॥ ३०॥
ऐसी परस्परें आवडी । स्त्रीपुरुषांची माहां गोडी ।
हे मुळींहून चालिली रोकडी । विवेकें पाहावी ॥ ३१॥
मुळीं सूक्ष्म निर्माण जालें । पुढें पष्ट दिसोन आलें ।
उत्पतीचें कार्य चाले । उभयतांकरितां ॥ ३२॥
मुळीं शिवशक्ती खरें । पुढें जालीं वधुवरें ।
चौऱ्यासि लक्ष विस्तारें । विस्तारली जे ॥ ३३॥
येथें शिवशक्तीचें रूप केलें । श्रोतीं मनास पाहिजे आणिलें ।
विवरलियांविण बोलिलें । तें वेर्थ जाणावें ॥ ३४॥
इति श्रीदासभोधे गुरुशिष्यसंवादे
शिवशक्तिनिरूपणनाम समास दुसरा ॥ २॥ १७.२

समास तिसरा : श्रवणनिरूपण

॥ श्रीराम ॥

थांबाथांबा ऐका ऐका । आधींच ग्रंथ सोडूं नका ।
सांगितलें तें ऐका । सावधपणें ॥ १॥
श्रव्णनामध्यें सार श्रवण । तें हें अध्यात्मनिरूपण ।
सुचित करून अंतःकर्ण । ग्रन्थामधें विवरावें ॥ २॥
श्रवणमननाचा विचार । निजध्यासें साक्षात्कार ।
रोकडा मोक्षाचा उधार । बोलोंचि नये ॥ ३॥
नाना रत्नें परीक्षितां । अथवा वजनें करितां ।
उत्तम सोनें पुटीं घालतां । सावधान असावें ॥ ४॥
नाना नाणीं मोजून घेणें । नाना परीक्षा करणें ।
विवेकी मनुष्यासी बोलणें । सावधपणें ॥ ५॥
जैसें लाखोलीचें धान्य । निवडून वेंचितां होते मान्य ।
सगट मानितां अमान्य । देव क्षोभे ॥ ६॥
येकांतीं नाजुक कारबार । तेथें असावें अति तत्पर ।
त्याच्या कोटिगुणें विचार । अध्यात्मग्रन्थीं ॥ ७॥
काहिण्या कथा गोष्टी पवाड । नाना अवतारचरित्रें वाड ।
त्या समस्तांमध्यें जाड । अध्यात्मविद्या ॥ ८॥
गत गोष्टीस ऐकिलें । तेणें काये हातास आलें ।
म्हणती पुण्य प्राप्त जालें । परी तें दिसेना कीं ॥ ९॥
तैसें नव्हे अध्यात्मसार । हा प्रचितीचा विचार ।
कळतां अनुमानाचा संव्हार । होत जातो ॥ १०॥
मोठे मोठे येऊन गेले । आत्म्याकरितांच वर्तले ।

त्या आत्म्याचा महिमा बोले । ऐसा कवणु ॥ ११ ॥
युगानयुगें येकटा येक । चालवितो तिनी लोक ।
त्या आत्म्याचा विवेक । पाहिलाच पाहावा ॥ १२ ॥
प्राणी आले येऊन गेले । ते जैसे जैसे वर्तले ।
ते वर्तणुकेचें कथन केलें । इच्छेसारिखें ॥ १३ ॥
जेथें आत्मा नाहीं दाट । तेथें अवघें सरसपाट ।
अत्म्याविण बापुडें काष्ठ । काये जाणे ॥ १४ ॥
ऐसें वरिष्ठ आत्मज्ञान । दुसरें नाहीं यासमान ।
सृष्टीमधें विवेकी सज्जन । तेचि हें जाणती ॥ १५ ॥
पृथ्वी आणी आप तेज । याचा पृथिवीमध्यें समज ।
अंतरात्मा तत्वबीज । तें वेगळेंचि राहिलें ॥ १६ ॥
वायोपासून पैलिकडे । जो कोणी विवेकें पवाडे ।
जवळीच आत्मा सांपडे । त्या पुरुषासी ॥ १७ ॥
वायो आकाश गुणमाया । प्रकृतिपुरुष मूळमाया ।
सूक्ष्मरूपें प्रचित येया । कठीण आहे ॥ १८ ॥
मायादेवीच्या धांदली । सूक्ष्मीं कोण मन घाली ।
समजला त्यची तुटली । संदेहवृत्ती ॥ १९ ॥
मूळमाया चौथा देह । जाला पाहिजे विदेह ।
देहातीत होऊन राहे । धन्य तो साधु ॥ २० ॥
विचारें ऊर्ध चढती । तयासी च ऊर्धगती ।
येरां सकळां अधोगती । पदार्थज्ञानें ॥ २१ ॥
पदार्थ चांगले दिसती । परी ते सर्वेचि नासती ।
अतो भ्रष्ट ततो भ्रष्ट होती । लोक तेणें ॥ २२ ॥
याकारणें पदार्थज्ञान । नाना जिनसीचा अनुमान ।
सर्व सांडून निरंजन । धुंडीत जावें ॥ २३ ॥
अष्टांग योग पिंडदज्ञान । त्याहून थोर तत्वज्ञान ।
त्याहून थोर आत्मज्ञान । तें पाहिलें पाहिजे ॥ २४ ॥
मूळमायेचे सेवटीं । हरिसंकल्प मुळीं उठी ।
उपासनायोगें इठी । तेथें घातली पाहिजे ॥ २५ ॥
मन त्यापलिकडे जाण । निखळ ब्रह्म निर्गुण ।
निर्मळ निश्चळ त्याची खूण । गगनासारिखी ॥ २६ ॥
येथून तेथवरी दाटलें । प्राणीमात्रास भेटलें ।
पदार्थमात्रीं लिगटलें । व्यापून आहे ॥ २७ ॥
त्याऐसें नाहीं थोर । सूक्ष्माहून सूक्ष्म विचार ।
पिंडब्रह्माचा संव्हार । होतां कळे ॥ २८ ॥
अथवा पिंड ब्रह्मांड असतां । विवेकप्रळये पाहों जातां ।
शाश्वत कोण हें तत्वता । उमजों लागे ॥ २९ ॥
करून अवघा तत्वझाडा । सारासाराचा निवाडा ।
सावधपणें ग्रन्थ सोडा । सुखिनावें ॥ ३० ॥
इति श्रीदासभोधे गुरुशिष्यसंवादे
श्रवणनिरूपणनाम समास तिसरा ॥ ३ ॥ १७.३

समास चौथा : अनुमाननिरसन

॥ श्रीराम ॥

बहुत जनासी उपाये । वक्तयास पुसतां त्रासों नये ।
बोलतां बोलतां अन्वयें । सांडूं नये ॥ १ ॥
श्रोत्यानें आशंका घेतली । ते तत्काळ पाहिजे फेडिली ।
स्वगोष्टीनें सगोष्टी पेंचली । ऐसें न व्हावें ॥ २ ॥
पुढें धरितां मागें पेंचला । मागें धरितां पुढें उडाला ।
ऐसा सांपडतचि गेला । ठाइं ठाइं ॥ ३ ॥
पोहणारचि गुचक्या खातो । जनास कैसा काढूं पाहातो ।
आशय लोकांच राहातो । ठाइं ठाइं ॥ ३ ॥
आपणचि बोलिला संव्हार । आपणचि बोलिजे सर्वसार ।
दुस्तर मायेचा पार । टाकिला पाहिजे ॥ ५ ॥
जें जें सूक्ष्म नाम घ्यावें । त्याचें रूप बिंबऊन द्यावें ।
तरीच वक्ता म्हणवावें । विचारवंत ॥ ६ ॥
ब्रह्म कैसें मूळमाया कैसी । अष्टधाप्रकृती शिवशक्ती कैसी ।
शड्गुणेश्वराची स्थिति कैसी । गुणसाम्याची ॥ ७ ॥
अर्धनारीनटेश्वर । प्रकृतिपुरुषाचा विचार ।
गुणक्षोभिणी तदनंतर । त्रिगुण कैसे ॥ ८ ॥
पूर्वपक्ष कोठून कोठवरी । वाच्यांशलक्ष्यांशाची परी ।
सूक्ष्म नाना विचार करी । धन्य तो साधु ॥ ९ ॥
नाना पाल्हाळीं पडेना । बोलिलेंचि बोलावेना ।
मौन्यगर्भ अनुमाना । आणून सोडी ॥ १० ॥
घडी येक विमळ ब्रह्म । घडी येक सर्व ब्रह्म ।
द्रष्टा साक्षी सत्ता ब्रह्म । क्षण येक ॥ ११ ॥
निश्चळ तेंचि जालें चंचळ । चंचळ तेंचि ब्रह्म केवळ ।
नाना प्रसंगीं खळखळ । निवाडा नाहीं ॥ १२ ॥
चळतें आणी निश्चळ । अवघें चैतन्यचि केवळ ।
रूपें वेगळालीं प्रांजळ । कदापी बोलवेना ॥ १३ ॥
उगीच करी गथागोवी । तो लोकांस कैसें उगवी ।
नाना निश्चयें नाना गोवी । पडत जाते ॥ १४ ॥
भ्रमास म्हणे परब्रह्म । परब्रह्मास ह्मणे भ्रम ।
ज्ञातेपणाचा संभ्रम । बोलोन दावी ॥ १५ ॥
घाली शास्त्रांची दडपण । प्रचितिविण निरूपण ।
पुसों जातां उगाच सीण । अत्यंत मानी ॥ १६ ॥
ज्ञात्यास आणि पदार्थभिडा । तो काय बोलेल बापुडा ।
सारासाराचा निवाडा । जाला पाहिजे ॥ १७ ॥
वैद्य मात्रेची स्तुती करी । मात्रा गुण कांहींच न करी ।
प्रचितिविण तैसी परी । ज्ञानाची जाली ॥ १८ ॥
तेथें नाहीं सारासार । तेथें अवघा अंधकार ।
नाना परीक्षेचा विचार । राहिला तेथें ॥ १९ ॥
पाप पुण्य स्वर्ग नर्क । विवेक आणि अविवेक ।
सर्वब्रह्मीं काये येक । सांपडलें नाहीं ॥ २० ॥
पावन आणि तें पतन । दोनीं मानिलीं तत्समान ।
निश्चये आणि अनुमान । ब्रह्मरूप ॥ २१ ॥
ब्रह्मरूप जालें आघवें । तेथें काये निवडावें ।

आवघी साकरचि टाकावें । काये कोठें ॥ २२ ॥
तैसें सार आणि असार । अवघा जाला येकंकार ।
तेथें बळावळा अविचार । विचार कैंचा ॥ २३ ॥
वंद्य निंद्य येक जालें । तेथें काये हाता आलें ।
उन्मत्त द्रव्यें जें भुललें । तें भलतेंच बोले ॥ २४ ॥
तैसा अज्ञान भ्रमें भुलला । सर्व ब्रह्म म्हणोन बैसला ।
माहांपापी आणि भला । येकचि मानी ॥ २५ ॥
सर्वसंगपरित्याग । अव्हासवा विषयेभोग ।
दोघे येकचि मानितां मग । काये उरलें ॥ २६ ॥
भेद ईश्वर करून गेला । त्याच्या वाचेन न वचे मोडिला ।
मुखामधें घांस घातला । तो अपानीं घालावा ॥ २७ ॥
ज्या इंद्रियास जो भोग । तो तो करीं येथासांग ।
ईश्वराचें केलें जग । मोडितां उरेना ॥ २८ ॥
अवघी भ्रांतीची भुटाटकी । प्रचितिविण गोष्टी लटकी ।
वेड लागलें जे बटकी । ते भलतेंचि बोले ॥ २९ ॥
प्रत्ययज्ञाता सावधान । त्याचें ऐकावें निरूपण ।
आत्मसाक्षात्काराची खूण । तत्काळ बाणें ॥ ३० ॥
वेडें वांकडे जाणावें । आंधळें पाउलीं वोळखावें ।
बाश्कळ बोलणें सांडावें । वमक जैसें ॥ ३१ ॥
इति श्रीदासभोधे गुरुशिष्यसंवादे
अनुमाननिर्शननाम समास चौथा ॥ ४ ॥ १७.४

समास पांचवा : अजपानिरूपण

॥ श्रीराम ॥

येकवीस सहश्र सासें जपा । नेमून गेली ते अजपा ।
विचार पाहातां सोपा । सकळ कांहीं ॥ १ ॥
मुखीं नासिकीं असिजे प्राणें । तयास अखंड येणें जाणें ।
याचा विचार पाहाणें । सूक्ष्मदृष्टीं ॥ २ ॥
मुळीं पाहातां येक स्वर । त्याचा तार मंद्र घोर ।
त्या घोराहून सूक्ष्म विचार । अजपाचा ॥ ३ ॥
सरिगमपदनिस । सरिं मात्रुका सायास ।
प्रथम स्वरें मात्रुकांस । म्हणोन पाहावें ॥ ४ ॥
परेवाचेहून आर्तें । आणि पश्यंती खालतें ।
स्वराचे जन्मस्थान तें । तेथून उठे ॥ ५ ॥
येकांतीं उगेंच बैसावें । तेथें हें समजोन पाहावें ।
अखंड घ्यावें सांडावें । प्रभंजनासी ॥ ६ ॥
येकांतीं मौन्य धरून बैसे । सावध पाहातां कैसें भासे ।
सोहं सोहं ऐसे । शब्द होती ॥ ७ ॥
उच्चारेंविण जे शब्द । ते जाणावे सहजशब्द ।
प्रत्ययायेती परंतु नाद । कांहींच नाहीं ॥ ८ ॥
ते शब्द सांडून बैसला । तो मौनी म्हणावा भला ।
योगाभ्यासाचा गल्बला । याकारणें ॥ ९ ॥
येकांतीं मौन्य धरून बैसला । तेणें कोण शब्द जाला ।
सोहं ऐसा भासला । अंतर्यामीं ॥ १० ॥
धरितां सो सांडितां हं । अखंड चाले सोहं सोहं ।
याचा विचार पाहातां बहु । विस्तारला ॥ ११ ॥
देहधारक तितुका प्राणी । श्वेतजउद्भिजादिक खाणी ।
स्वासोस्वास नस्तां प्राणी । कैसे जिती ॥ १२ ॥
ऐसी हे अजपा सकळासी । परंतु कळे जाणत्यासी ।
सहज सांडून सायासी । पडोंच नये ॥ १३ ॥
सहज देव असतचि असे । सायासें देव फुटे नासे ।
नासिवंत देवास विश्वासे । ऐसा कवणु ॥ १४ ॥
जगदांतराचें दर्शन । सहज घडे अखंड ध्यान ।
आत्मइछेनें जन । सकळ वर्तती ॥ १५ ॥
आत्मयाचें समाधान । घडे तैसेंचि आशन ।
सांडिलें फिटलें समर्पण । तयासीच होये ॥ १६ ॥
अग्नपुरुष पोटीं वसती । तयास अवदानें सकळ देती ।
लोक आज्ञेमधें असती । आत्मयांचे ॥ १७ ॥
सहज देवजपध्यानें । सहज चालणें स्तुती स्तवनें ।
सहज घडे तें भगवान्नें । मान्य कीजे ॥ १८ ॥
सहज समजायाकारणें । नाना हटयोग करणें ।
परंतु येकायेकीं समजणें । घडत नाहीं ॥ १९ ॥
द्रव्य चुकतें दरिद्र येतें । तळीं लक्ष्मी वरी वर्ततें ।
प्राणी काये करील तें । ठाउकें नाहीं ॥ २० ॥
तळघरामधें उदंड द्रव्य । भिंतीमधें घातलें द्रव्य ।
स्तंभीं तुळवटीं द्रव्य । आपण मधें ॥ २१ ॥
लक्ष्मीमध्यें करंटा नांदे । त्याचें दरिद्र अधिक सांदे ।
नवल केलें परमानंदें । परमपुरुष ॥ २२ ॥
येक पाहाती येक खाती । ऐसी विवेकाची गती ।
प्रवृत्ति अथवा निवृत्ती । येणेंचि ज्ञायें ॥ २३ ॥
अंतरीं वसतां नारायेणें । लक्ष्मीस काये उणें ।
ज्याची लक्ष्मी तो आपणें । बळकट धरावा ॥ २४ ॥
इति श्रीदासभोधे गुरुशिष्यसंवादे
अजपानिरूपणनाम समास पांचवा ॥ ५ ॥ १७.५

समास सहावा : देहात्मनिरूपण

॥ श्रीराम ॥

आत्मा देहाध्यें असतो । नाना सुखदुखें भोगितो ।
सेवटीं शरीर सांडून जातो । येकायेकीं ॥ १ ॥
शरीरीं शक्ति तारुण्यपणीं । नाना सुखें भोगी प्राणी ।
अशक्त होतां वृद्धपणीं । दुःखें भोगी ॥ २ ॥
मरावेना ऐसी आवडी । हातपाये खोडून प्राण सोडी ।
नाना दुःखें अवघडी । वृद्धपणीं ॥ ३ ॥
देहआत्मयांची संगती । कांहींयेक सुख भोगिती ।
चर्फडचर्फडून जाती । देहांतकाळीं ॥ ४ ॥
ऐसा आत्मा दुःखदायेक । येकांचे प्राण घेती येक ।
आणी सेवटीं निरार्थक । कांहींच नाहीं ॥ ५ ॥
ऐसा दों दिसांचा भ्रम । त्यास म्हणती परब्रह्म ।

नाना दुःखाचा संभ्रम । मानून घेतला ॥। ६ ॥
दुःखी होऊन चर्फडून गेले । तेथें कोण समाधान जालें ।
कांहींयेकसुख भोगिलें । तों सवेंचि दुःख ॥ ७ ॥
जन्म दारभ्य आठवावें । म्हणिजे अवघें पडेल ठावें ।
नाना दुःख मोजावें । काये म्हणोनी ॥ ८ ॥
ऐसी आत्मयाची संगती । नाना दुःखें प्राप्त होती ।
दैन्यवाणे होऊन जाती । प्राणीमात्र ॥ ९ ॥
कांहीं आनंद कांहीं खेद । जन्मवरी पडिला समंध ।
नाना प्रकरीं विरुद्ध । तडातोडी ॥ १० ॥
निद्राकाळीं ढेकुण पिसा । नाना प्रकारीं वळसा ।
नाना उपायें वळसा । त्यांस होये ॥ ११ ॥
भोजनकाळी माश्या येती । नाना पदार्थ उंदीर नेती ।
पुढें त्यांची हि फजिती । मार्जरें करिती ॥ १२ ॥
वा चामवा गोंचिड । गांधेलें कानटें उदंड ।
येकास येक चर्फड । दोहिकडे ॥ १३ ॥
विंचु सर्प वाग रिसें । सुसरी लांडिगे माणसास माणसें ।
परस्परें सुखसंतोषें । येकहि नाहीं ॥ १४ ॥
चौऱ्यासि लक्ष उत्पत्ती । येकास येक भक्षिती ।
नाना पीडा दुःखणी किती । म्हणौन सांगावें ॥ १५ ॥
ऐसी अंतरात्म्याची करणी । नाना जीव दाटले धरणीं ।
परस्परें संव्हारणी । येकयेकांची ॥ १६ ॥
अखंड रडती । चर्फडिती । विवळविवळों प्राण देती ।
मूर्ख प्राणी त्यास म्हणती । परब्रह्म ॥ १७ ॥
परब्रह्म जाणार नाहीं । कोणास दुःख देणार नाहीं ।
स्तुती निंदा दोनी नाहीं । परब्रह्मीं ॥ १८ ॥
उदंड शिव्या दिधल्या । तितुक्या अंतरात्म्यास लागल्या ।
विचार पाहातां प्रत्यया आल्या । येथातथ्य ॥ १९ ॥
धगडीचा बटकीचा लवंडीचा । गधडीचा कुतरीचा वोंगळीचा ।
ऐसा हिशेब सिव्यांचा । किती म्हणोनि सांगावा ॥ २० ॥
इतुकें परब्रह्मीं लागेना । तेथें कल्पनाचि चालेना ।
तडातोडीचें ज्ञान मानेना । कोणीयेकासी ॥ २१ ॥
सृष्टीमधें सकळ जीव । सकळांस कैचें वैभव ।
याकारणें ठायाठाव । निर्मिला देवें ॥ २२ ॥
उदंड लोक बाजारीचे । जें जें आलें तें तें वेंचे ।
उत्तम तितुके भाग्याचें । लोक घेती ॥ २३ ॥
येणें न्यायें अन्न वसन । येणेंचि न्यायें देवतार्चन ।
येणेंचि न्यायें ब्रह्मज्ञान । प्राप्तव्यासारिखें ॥ २४ ॥
अवघेच लोक सुखी असती । संसार गोड करून नेती ।
माहाराजे वैभव भोगती । तें करंट्यास कैचें ॥ २५ ॥
परंतु अंतीं नाना दुःखें । तेथें होतें सगट सारिखें ।
पूर्वीं भोगिलीं नाना सुखें । अंतीं दुःख सोसवेना ॥ २६ ॥
कठिण दुःख सोसवेना । प्राण शरीर सोडिना ।
मृत्यदुःख सगट जना । कासाविस करी ॥ २७ ॥
नाना अवेवहीन जालें । तैसेंचि पाहिजे वर्तलें ।
प्राणीं अंतकाळीं गेलें । कासाविस होउनी ॥ २८ ॥
रूप लावण्य अवघें जातें । शरीरसामर्थ्य अवघें राहातें ।
कोणी नस्तां मरतें । आपदआपदों ॥ २९ ॥
अंतकाळ दैन्य दीन । सकळिकांस तत्समान ।
ऐसें चंचळ अवलक्षण । दुःखकारी ॥ ३० ॥
भोगून अभोक्ता म्हणती । हे तों अवघीच फजिती ।
लोक उगेच बोलती । पाहिल्याविण ॥ ३१ ॥
अंतकाळ आहे कठिण । शेरीर सोडिना प्राण ।
बराड्यासारिखें लक्षण । अंतकाळीं ॥ ३२ ॥
इति श्रीदासभोधे गुरुशिष्यसंवादे
देहात्मनिरूपणनाम समास सहावा ॥ ६ ॥ १७.६

समास सातवा : जगजीवननिरूपण

॥ श्रीराम ॥

मुळीं उदक निवळ असतें । नाना वल्लिमधें जातें ।
संगदोषें तैसें होतें । आंब्ल तिक्षण कडवट ॥ १ ॥
आत्मा आत्मपणें असतो । देहसंगें विकारतो ।
साभिमानें भरीं भरतो । भलतिकडे ॥ २ ॥
बरी संगती सांपडली । जैसी उंसास गोडी आली ।
विषवल्ली फांपावली । घातकी प्राणी ॥ ३ ॥
अठराभार वनस्पती । गुण सांगावे ते किती ।
नाना देहाचे संगती । आत्मयास होये ॥ ४ ॥
त्यामधें कोणी भले । ते संतसंगें निघाले ।
देहाभिमान सांडून गेले । विवेकबळें ॥ ५ ॥
उदकाचा नाशचि होतो । आत्मा विवेकें निघतो ।
ऐसा आहे प्रत्यय तो । विवेकें पाहा ॥ ६ ॥
ज्यास स्वहितचि करणें । त्यास किती म्हणौन सांगणें ।
हें ज्याचें त्यानें समजणें । सकळ कांहीं ॥ ७ ॥
आपला आपण करी कुडावा । तो आपला मित्र जाणावा ।
आपला नाश करी तो समजावा । वैरी ऐसा ॥ ८ ॥
आपलें आपण अन्हित करावें । त्यास आडवें कोणें निघावें ।
येकांती जाऊन जीवें । मारी आपणासी ॥ ९ ॥
जो आपला आपण घातकी । तो आत्महत्यारा पातकी ।
याकारणें विवेकी । धन्य साधु ॥ १० ॥
पुण्य्वंतां सत्संगती । पापिष्टां असत्संगती ।
गति आणि अवगती । संगतीयोगें ॥ ११ ॥
उत्तम संगती धरावी । आपली आपण चिंता करावी ।
अंतरी बरी विवरावी । बुद्धि जाणत्याची ॥ १२ ॥
इहलोक आणि परलोक । जाणता तो सुखदायेक ।
नेणत्याकरितां अविवेक । प्राप्त होतो ॥ १३ ॥
जाणता देवाचा अंश । नेणता म्हणिजे तो राक्षस ।
यामधें जें विशेष । तें जाणोन घ्यावें ॥ १४ ॥
जाणतां तो सकळां मान्य । नेणता होतो अमान्य ।

जेणेंकरितां होईजे धन्य । तेंचि घ्यावें ॥ १५ ॥
साक्षपी शाहाण्याची संगती । तेणें साक्षपी शाहाणे होती ।
आळसी मूर्खाची संगती । आळसी मूर्ख ॥ १६ ॥
उत्तम संगतीचें फळ सुख । अद्धम संगतीचें फळ दुःख ।
आनंद सांडुनियां शोक । कैसा घावा ॥ १७ ॥
ऐसें हें प्रगट दिसे । जनामधें उदंड भासे ।
प्राणीमात्र वर्ततसे । उभयेयोगें ॥ १८ ॥
येका योगें सकळ योग । येका योगें सकळ वियोग ।
विवेकयोगें सकळ प्रयोग । करीत जवे ॥ १९ ॥
अवचितें सांकडींत पडिलें । तरी तेथून पाहिजे निघालें ।
निघोन जातां जालें । परम समाधान ॥ २० ॥
नाना दुर्जनांचा संग । क्षणक्षणा मनभंग ।
याकारणें कांहीं रंग । राखोन जावें ॥ २१ ॥
शाहाणा येत्न त्याच्या गुणें । पाहों जातां काये उणें ।
सुख संतोष भोगणें । नाना श्लाघ्यता ॥ २२ ॥
अतां लोकीं ऐसें आहे । सृष्टीमधें वर्तताहे ।
जो कोणी समजोन पाहे । त्यास घडे ॥ २३ ॥
बहुरत्न वसुंधरा । जाणजाणों विचार करा ।
समजल्यां प्रत्ययो अंतरास । मार्जी येतो ॥ २४ ॥
दुर्बळ अणि संपन्न । वेडें आणि वित्पन्न ।
हें अखंड दंडायमान । असतचि असे ॥ २५ ॥
येक भाग्यपुरुष मोडती । येक नवे भाग्यवंत होती ।
तैसीच विद्या वित्पती । होत जाते ॥ २६ ॥
येक भरे येक रितें । रितें मागुतें भरतें ।
भरतेंहि रितें होतें । काळांतरीं ॥ २७ ॥
ऐसी हे सृष्टीची चाली । संपत्ति दुपारची साउली ।
वयेसा तरी निघोन गेली । हळुहळु ॥ २८ ॥
बाळ तारुण्य आपुलें । वृधाप्य प्रचितीस आलें ।
ऐसें जाणोन सार्थक केलें । पाहिजे कोणियेकें ॥ २९ ॥
देह जैसें केलें तैसें होतें । येत्न केल्यां कार्ये साधतें ।
तरी मग कष्टावें तें । काय निमित्य ॥ ३० ॥
इति श्रीदासभोधे गुरुशिष्यसंवादे
जगजीवननिरूपणनाम समास सातवा ॥ ७ ॥ १७.७

समास आठवा : तत्त्वनिरसन

॥ श्रीराम ॥

नाभीपासून उन्मेषवृत्ती । तेचि परा जाणिजे श्रोतीं ।
ध्वनिरूप पश्यंती । हृदई वसे ॥ १ ॥
कंठापासून नाद जाला । मध्यमा वाचा बोलिजे त्याला ।
उच्चर होतां अक्षराला । वैखरी बोलिजे ॥ २ ॥
नाभिस्थानीं परा वाचा । तोचि ठाव अंतःकर्णाचा ।
अंतःकर्णपंचकाचा । निवाडा ऐसा ॥ ३ ॥
निर्विकल्प जें स्फुरण । उगेंच असतां आठवण ।
तें जाणावें अंतःकर्ण । जाणतीकळा ॥ ४ ॥
अंतःकर्ण आठवलें । पुढें होये नव्हेसें गमलें ।
करूं न करू ऐसें वाटलें । तेंचि मन ॥ ५ ॥
संकल्प विकल्प तेंचि मन । जेणें करितां अनुमान ।
पुढें निश्चयो तो जाण । रूप बुद्धीचें ॥ ६ ॥
करीनचि अथवा न करी । ऐसा निश्चयोचि करी ।
तेचि बुद्धि हे अंतरीं । विवेकें जाणावी ॥ ७ ॥
जे वस्तुचा निश्चये केला । पुढें तेचि चिंतूं लागला ।
तें चित्त बोलिल्या बोला । येथार्थ मानावें ॥ ८ ॥
पुढें कार्याचा अभिमान धरणें । हें कार्ये तों अगत्य करणें ।
ऐस्या कार्यास प्रवर्तणें । तोचि अहंकारु ॥ ९ ॥
ऐसें अंतःकर्णपंचक । पंच वृत्ती मिळोन येक ।
कार्येभागें प्रकारपंचक । वेगळाले ॥ १० ॥
जैक्षे पांचहि प्राण । कार्येभागें वेगळाले जाण ।
नाहीं तरी वायोचें लक्षण । येकचि असे ॥ ११ ॥
सर्वांगीं व्यान नाभी समान । कंठी उदान गुदीं अपान ।
मुखीं नासिकीं प्राण । नेमस्त जाणावा ॥ १२ ॥
बोलिलें हें प्राणपंचक । आतां ज्ञानइंद्रियेंपंचक ।
श्रोत्र त्वचा चक्षु जिव्हा नासिक । ऐसीं हें ज्ञानेंद्रियें ॥ १३ ॥
वाचा पाणी पाद शिस्न गुद । हे कर्मइंद्रियें प्रसिद्ध ।
शब्द स्परुष रूप रस गंध । ऐसें हें विषयपंचक ॥ १४ ॥
अंतःकर्ण प्राणपंचक । ज्ञानेंद्रियें कर्मेंद्रिये पंचक ।
पांचवें विषयपंचक । ऐसीं हे पांच पंचकें ॥ १५ ॥
ऐसें हे पंचविस गुण । मिळोन सूक्ष्म देह जाण ।
याच कर्दम बोलिला श्रवण । केलें पाहिजे ॥ १६ ॥
अंतःकर्ण व्यान श्रवण वाचा । शब्द विषये आकाशाचा ।
पुढें विस्तार वायोचा । बोलिला असे ॥ १७ ॥
मन समान त्वचा पाणी । स्पर्श रूप हा पवनीं ।
ऐसे हे अडाखे साधुनी । कोठा करावा ॥ १८ ॥
बुद्धि उदान नयेन चरण । रूपविषयाचें दर्शन ।
संकेतें बोलिलें मन । घालून पाहिजे ॥ १९ ॥
चित्त अपान जिव्हा शिस्न । रसविषये आप जाण ।
पुढें ऐका सावधान । पृथ्वीचें रूप ॥ २० ॥
अहंकार प्राण घ्राण । गुद गंधविषये जाण ।
ऐसे केलें निरूपण । शास्त्रमतें ॥ २१ ॥
ऐसा हा सूक्ष्म देहे । पाहातां होईजे निसंदेहे ।
येथें मन घालून पाहे । त्यासीच हें उमजे ॥ २२ ॥
ऐसें सूक्ष्म देहे बोलिलें । पुढें स्थूळ निरोपिलें ।
आकाश पंचगुणें वर्तलें । कैसें स्थुळीं ॥ २३ ॥
काम क्रोध शोक मोहो भये । हा पंचविध आकाशाचा अन्वये ।
पुढें पंचविध वायो । निरोपिला ॥ २४ ॥
चळण वळण प्रासारण । निरोध आणि आकोचन ।
हें पंचविध लक्षण । प्रभंजनाचें ॥ २५ ॥
क्षुधा त्रुषा आलस्य निद्रा मैथुन । हे तेजाचे पंचविध गुण ।

आतां पुढें आपलक्षण । निरोपिलें पाहिजे ॥ २६ ॥
शुक्लीत श्रोणीत लाळ मूत्र स्वेद । हा पंचविध आपाचा भेद ।
पुढें पृथ्वी विशद । केली पाहिजे ॥ २७ ॥
अस्ति मांष त्वचा नाडी रोम । हे पृथ्वीचे पंचविध धर्म ।
ऐसे स्थूळ देहाचें वर्म । बोलिलें असे ॥ २८ ॥
पृथ्वी आप तेज वायो आकाश । हे पांचाचे पंचविस ।
ऐसें मिळोन स्थूळ देहास । बोलिजेतें ॥ २९ ॥
तिसरा देह कारण अज्ञान । चौथा माहांकारण ज्ञान ।
हे च्यारी देह निर्शितां विज्ञान । परब्रह्म तें ॥ ३० ॥
विचारें चौदेहावेगळें केलें । मीपण तत्वासरिसें गेलें ।
अनन्य आत्मनिवेदन जालें । परब्रह्मीं ॥ ३१ ॥
विवेकें चुकला जन्म मृत्य । नरदेहीं साधिलें महत्कृत्य ।
भक्तियोगें कृत्यकृत्य । सार्थक जालें ॥ ३२ ॥
इति श्री पंचीकर्ण । केलेंचि करावें विवर्ण ।
लोहाचें जालें सुवर्ण । परिसाचेनयोगें ॥ ३३ ॥
हाहि दृष्टांत घडेना । परिसाचेन परीस करवेना ।
शरण जातां साधुजना । साधुच होइजे ॥ ३४ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे तत्त्वनिरूपणनाम समास आठवा ॥ ८ ॥

समास नवना : तनुचतुष्टयनिरूपण

॥ श्रीराम ॥

स्थूळ सूक्ष्म कारण माहाकारण । ऐसे हे चत्वार देह जाण ।
जागृति स्वप्न सुषुप्ति पूर्ण । तुर्या जाणावी ॥ १ ॥
विश्व तैजस प्राज्ञ । प्रत्यगात्मा हे अभिमान ।
नेत्रस्थान कंठस्थान हृदयस्थान । मूर्धनी ते ॥ २ ॥
स्थूळभोग प्रविक्तभोग । आनंदभोग आनंदावभासभोग ।
ऐसे हे चत्वार भोग । चौदेहाचे ॥ ३ ॥
अकार उकार मकार । अर्धमात्रा तो ईश्वर ।
ऐस्या मात्रा चत्वार । चौदेहाच्या ॥ ४ ॥
तमोगुण रजोगुण । सत्त्वगुण शुद्धसत्वगुण ।
ऐसे हे चत्वार गुण । चौदेहाचे ॥ ५ ॥
क्रियाशक्ति द्रव्याशक्ती । इछाशक्ति ज्ञानशक्ती ।
ऐशा चत्वार शक्ती । चौदेहाच्या ॥ ६ ॥
ऐसीं हे बत्तिस तत्वें । दोहींचीं पन्नास तत्वें ।
अवघीं मिळोन ब्यासि तत्वें । अज्ञान आणी ज्ञान ॥ ७ ॥
ऐसीं हे तत्वें जाणावीं । जाणोन माइक वोळखावीं ।
आपण साक्षी निरसावीं । येणें रितीं ॥ ८ ॥
साक्षी म्हणिजे ज्ञान । ज्ञानें वोळखावें अज्ञान ।
ज्ञानाज्ञानाचें निर्शन । देहासरिसें ॥ ९ ॥
ब्रह्मांडीं देह कल्पिले । विराट हिरण्यगर्भ बोलिले ।
ते हे विवेकें निर्शले । आत्मज्ञानें ॥ १० ॥
आत्मानात्माविवेक करितां । सारासारविचार पाहातां ।
पंचभूतांची माइक वार्ता । प्रचित आली ॥ ११ ॥
अस्ति मांष त्वचा नाडी रोम । हे पांचहि पृथ्वीचे गुणधर्म ।
प्रत्यक्ष शरीरीं हें वर्म । शोधून पाहावें ॥ १२ ॥
शुक्लीत श्रोणीत लाळ मूत्र स्वेद । हे आपाचे पंचकभेद ।
तत्वें समजोन विशद । करून घावीं ॥ १३ ॥
क्षुधा त्रुषा आलस्य निद्रा मैथुन । हे पांचहि तेजाचे गुण ।
या तत्वांचें निरूपण । केलेंचि करावें ॥ १४ ॥
चळण वळण प्रासारण । निरोध आणि आकोचन ।
हें पंचहि वायोचे गुण । श्रोतीं जाणावे ॥ १५ ॥
काम क्रोध शोक मोहो भये । हा आकाशाचा परिपाये ।
हें विवरल्याविण काये । समजों जाणें ॥ १६ ॥
असो ऐसें हें स्थूळ शरीर । पंचविस तत्वांचा विस्तार ।
आतां सूक्ष्मदेहाचा विचार । बोलिजेल ॥ १७ ॥
अंतःकर्ण मन बुद्धि चित्त अहंकार । आकाशपंचकाचा विचार ।
पुढें वायो निरोत्तर । होऊन ऐका ॥ १८ ॥
व्यान समान उदान । प्राण आणी अपान ।
ऐसे हे पांचहि गुण । वायोतत्वाचे ॥ १९ ॥
श्रोत्र त्वचा चक्षु जिव्हा घ्राण । हें पांचहि तेजाचे गुण ।
आतां आप सावधान । होऊन ऐका ॥ २० ॥
वाचा पाणी पाद शिस्न गुद । हे आपाचे गुण प्रसिद्ध ।
आतां पृथ्वी विशद । निरोपिली ॥ २१ ॥
शब्द स्पर्श रूप रस गंध । हे पृथ्वीचे गुण विशद ।
ऐसे हे पंचवीस तत्वभेद । सूक्ष्म देहाचे ॥ २२ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे तनुचतुष्टयेनाम समास नववा ॥ ९ ॥ १७.९

समास दहावा : टोणपसिद्धलक्षण

॥ श्रीराम ॥

आवर्णोदकीं हटकेश्वर । त्यास घडे नमस्कार ।
महिमा अत्यंतचि थोर । तया पाताळलिंगाचा ॥ १ ॥
परंतु तेथें जाववेना । शरीरें दर्शन घडेना ।
विवेकें आणावें अनुमाना । तया ईश्वरासी ॥ २ ॥
सातां समुद्रांचे वेडे । उदंड भूमि पैलिकडे ।
सेवटीं तुटले कडे । भूमंडळाचे ॥ ३ ॥
सात समुद्र वोलांडावे । तेथें जाणें कैसें फावे ।
म्हणोन विवेकी असावे । साधुजन ॥ ४ ॥
जें आपणास नव्हे ठावें । तें जाणतयास पुसावें ।
मनोवेगें तनें फिरावें । हें तों घडेना ॥ ५ ॥
जें चर्मदृष्टीस नव्हे ठावें । तें ज्ञानदृष्टीनें पाहावें ।
ब्रह्मांड विवरोन राहावें । समाधानें ॥ ६ ॥
मध्यें आहे भूमीचें चडळ । म्हणौन आकाश आणि पाताळ ।
तें चडळ नस्तां अंतराळ । चहुंकडे ॥ ७ ॥
तयास परब्रह्म म्हणावें । जें उपाधीवेगळें स्वभावें ।
जेथें दृश्यमायेच्या नांवें । सुन्याकार ॥ ८ ॥
दृष्टीचें देखणें दृश्य । मनाचें देखणें भास ।
मनातीत निराभास । विवेकें जाणावें ॥ ९ ॥
दृश्य भास अवघा विघडे । विवेक तेथें पवाडे ।

भूमंडळीं ज्ञाते थोडे । सूक्ष्मदृष्टीचे ॥ १० ॥
वाच्यांश वाचेनें बोलावा । न बोलतां लक्ष्यांश जाणावा ।
निर्गुण अनुभवास आणावा । गुणाचेनयोगें ॥ ११ ॥
नाना गुणास आहे नाश । निर्गुण तें अविनाश ।
ढोबळ्याहून विशेष । सूक्ष्म देखणें ॥ १२ ॥
जें दृष्टीस न पडे ठावें । तें ऐकोन जाणावें ।
श्रवणमननें पडे ठावें । सकळ कांहीं ॥ १३ ॥
अष्टधेचे जिनस नाना । उदंड पाहातां कळेना ।
अवघें सगट पिटावेना । कोणियेकें ॥ १४ ॥
सगट सारिखी स्थिती जाली । तेथें परीक्षाच बुडाली ।
चविनटानें कालविलीं । नाना अन्नें ॥ १५ ॥
टोणपा नव्हे गुणग्राहिक । मुर्खास कळेना विवेक ।
विवेक आणि अविवेक । येकचि म्हणती ॥ १६ ॥
उंच नीच कळेना ज्याला । तेथें अभासचि बुडाला ।
नाना अभ्यासें प्राणियाला । सुटिका कैंची ॥ १७ ॥
वेड लागोन जालें वोंगळ । त्यास सारिखेंच वाटे सकळ ।
तें जाणावें बाउकळ । विवेकी नव्हेती ॥ १८ ॥
ज्यास अखंड होतो नाश । त्यासीच म्हणती अविनाश ।
बहुचकीच्या लोकांस । काये म्हणावें ॥ १९ ॥
ईश्वरें नाना भेद केले । भेदें सकळ सृष्टी चाले ।
आंधळे परीक्षवंत मिळाले । तेथें परीक्षा कैंची ॥ २० ॥
जेथें परीक्षेचा अभाव । तो टोणपा समुदाव ।
गुणचि नाहीं गौरव । येईल कैंचें ॥ २१ ॥
खरें खोटें येकचि जालें । विवेकानें काय केलें ।
असार सांडून सार घेतलें । साधुजनीं ॥ २२ ॥
उत्तम वस्तूचि परीक्षा । कैसी घडे नतद्रक्षा ।
दीक्षाहीनापासीं दीक्षा । येईल कैंची ॥ २३ ॥
आपलेन वोंगळपणें । दिशाकरून शौच्य नेणे ।
वेद शास्त्रें पुराणें । त्यास काये करिती ॥ २४ ॥
आधीं राखावा आचार । मग पाहावा विचार ।
आचारविचारें पैलपार । पाविजेतो ॥ २५ ॥
जे नेमकास न कळे । तें बउकळास केवीं कळे ।
डोळस ठकती आंधळे । कोण्या कामाचे ॥ २६ ॥
पापपुण्य स्वर्ग नर्क । अवघेंच मानिलें येक ।
विवेक आणी अविवेक । काये मानावें ॥ २७ ॥
अमृत विष येक म्हणती । परी विष घेतां प्राण जाती ।
कुकर्में होते फजिती । सत्कर्में कीर्ति वाढे ॥ २८ ॥
इहलोक आणि परलोक । जेथें नाहीं साकल्प विवेक ।
तेथें अवघेच निरार्थक । सकळ कांहीं ॥ २९ ॥
म्हणौन संतसंगेंचि जावें । सत्शास्त्रचि श्रवण करावें ।
उत्तम गुणास अभासावें । नाना प्रयेत्नें ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे
टोणपसिद्धलक्षणनाम समास दहावा ॥ १० ॥ १७.१०
॥ दशक सतरावा समाप्त ॥

Encoded and proofread by Vishwas Bhide.
Reproofread by P. D. Kulkarni